





# नाट्यवाचन स्पर्धेमध्ये विद्यापीठाला पारितोषिक

सिंबायोसिस विद्यापीठाने आयोजित केलेल्या नाट्यवाचन स्पर्धेमध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघाने 'कॉर्नर' ह्या चैतन्य सरदेशपांडे लिखित संहितेचे वाचन केले. त्यासाठी विद्यापीठाला सांघिक तृतीय आणि सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनय (पुरुष) हि पारितोषिके मिळाली.

ह्या स्पर्धेचे हे ३९वे वर्ष होते. ह्या वर्षी एकूण २३ संघांनी सादरीकरण केले. त्यापैकी ९ संघ अंतिम फेरीत दाखल झाले. गेल्यावर्षी देखील टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा संघ अंतिम फेरीत दाखल झाला होता.

ह्या एकांकिकेचे दिग्दर्शन ज्ञानेश्वरी वानखेडे ह्या मास कम्युनिकेशन च्या विद्यार्थिनीने केले होते. ह्या संघात रोहन साळवे (कॉम्प्युटर सायन्स), सोहमभार्गव (डिजिटल आर्ट्स), अनिकेत येलमार (कॉम्प्युटर सायन्स), क्षितिज अभ्यंकर (फिसिओथेरॅपी), तेजस शिवगण (डिजिटल आर्ट्स), प्रज्ञा वाघमारे (फिसिओथेरॅपी) आणि ज्ञानेश्वरी वानखेडे (मास कम्युनिकेशन) ह्यांचा सामावेश होता. ह्यातील अनिकेत येलमार (कॉम्प्युटर सायन्स) ह्यास सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनय (पुरुष) हे मनाचे पारितोषिक देखील मिळाले.